ISSN 2320-6128

# Indian Thinker

International Research Journal Registered & Recognized Higher Education For All Subjects & All Languages

Editor In Chief

Arun B. Godam

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

INDIAN THINKER
University Research Journal
ISSN - 2319- 8648
Vol I Issue VIII, Aug. 2016 to Jan. 2017

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

# INDEX



| Sr. No. | Title of Research Paper | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | महाराष्ट्रातील लिंग निगडित मानवी विकास निर्देशांक | प्रा. आर.के. नाळे | 6 |
| 2 | "काय सांगता? एस. टी. नफ्यातय?" | प्रा. सुभाष रामराव यादव | 14 |
| 3 | राष्ट्रीय अन्न सुरक्षा विधेयकाचा आढावा | प्रा.यादव जरीचंद बाळासाहेब, डॉ. मुळे एम.पी. | 17 |
| 4 | अनेक वर्षानंतर आपत्ती-ही आपत्तीच। | प्रा. संयज बी. नवले | 21 |
| 5 | नागरीकरणाचा समाजजीवनावर होणारा परिणाम : एक भौगोलिक अभ्यास | प्रा. पी.टी. वाघमारे, प्रा. ओ.पी. देसाई | 24 |
| 6 | महाराष्ट्राच्या सामाजिक विकासात वृत्तपत्राचे योगदान | प्रा. डॉ. बालाजी शिंदे | 35 |
| 7 | लोकसाहित्यातील लोककथेचे स्वरुप | प्रा. राजू नागनाथ नवले | 39 |
| 8 | दीर्घ पल्याचे सत्र मांडणारी कविता : आले ढग गेले ढग | डॉ. युवराव धबडगे | 44 |
| 9 | सॉफ्टबॉल खेळाडुंची गुणवत्ता संवर्धनासाठी राबविले जाणारे उपक्रम व योजना आणि क्रिडा विशयक समस्या | गजानन दत्ता कदम, प्रा. डॉ. दीपक द्वारकादास | 49 |
| 10 | उत्तर कोरिया : एक अण्विक कोडे | डॉ. बी.डी. तोडकर | 54 |
| 11 | महिला सबलीकरण : राजकीय विश्लेषण | प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबूराव | 62 |

INDIAN THINKER
Half yearly Research Journal
62
ISSN - 2319-8648
Vol I Issue VIII, Aug. 2016 to Jan. 2017

# महिला सबलीकरण : राजकीय विश्लेषण

प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबूराव
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय देगलूर
ता.देगलूर जि.नांदेड.

11

## Research Paper - Political Sci

लोकसहभागीत्व ही लोकशाहीची पूर्व अटच असते. वर्तमान भारतीय राजकीय व्यवस्थेचे अवलोकन करता त्यात महिलांचे सहभागीत्व नगण्य आहे. ते त्यांच्या अंगभुत क्षमता नुसार नाही. ते का नाही ? याचा विचार करणे सामाजिक शास्त्रातील अभ्यासकाचे कर्तव्य ठरते. म्हणून प्रस्तुत लेखात भारतातील महिलांचे राजकीय सबलीकरण कसे घडुन आले. त्यात आणखीन भर पाडण्यासाठी आपणास काय उपाययोजना कराव्या लागतील. या सर्वांचा आढावा घेण्यात आला आहे. तो ही अगदी सविस्तरपणे ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर भारतातील महिलांच्या राजकीय सबलीकरणाविषयी चिंतन होणे क्रमप्राप्त वाटल्यामुळे हा लेख प्रपंच करण्यात आला. पुरुषांच्या तुलनेत महिलांच्या राजकीय सबलीकरणाचा वेग अति मंदावलेला आहे. परंतू २१ व्या शतकापासून त्यात वाढ होत आहे. हे गृहित धरुन मांडणी करण्यात आली आहे.

व्यावसायिकांचे प्रभुत्व असणाऱ्या शतकात अध्यापकांच्या शाब्दीक बडबडीकडे लक्ष देण्यास मोबाईल व्यक्ती व समाजाला वेळ नसतो किंवा त्याची गरज वाटत नाही. तरीही अध्यापकांने वारंवार, व्यवस्थेप्रतीच्या आपल्या मौलिक चिंतनास लिखाण व अभिव्यक्तीच्या साह्याने समाजापुढे व्यक्त करायचे असते. ते कर्तव्य व सामाजिक जवाबदारीच्या भावनेतून. या कर्तव्याच्या भावनेतुनच भारतातील महिलांची राजकीय सामाजिकरण, राजकीय जाणीव जागृती, राजकीय शिक्षण, राजकीय सहभाग इ. राजकीय सबलीकरणाशी संबंधीत असणाऱ्या संकल्पना व बाबीवर प्रकाश टाकला आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या ६९ वर्षानंतर आपण काय मिळवले व काय मिळवायचे आहे. यावर एक नजर टाकली असता असंख्य प्रश्न व विषय मनात निर्माण होतील. त्या असंख्य प्रश्नांपैकी एक म्हणजे महिलांचे स्वातंत्र्य,अधिकार,दर्जा, प्रतिष्ठा व सबलीकरण या विषयी मागील ६९ वर्षात आम्ही काय केले? जे केले ते लोकशाहीचा अर्धा भाग असणाऱ्या भागासाठी पर्याप्त आहे का ? त्यात आणखीन काय सुधारणा कराव्या लागतील ? जेणेंकरुन महिलांचे सबलीकरण होईल. महिलांचे सबलीकरण ही एक फार अतिव्यापक संकल्पना आहे. त्यातील महत्वाचा भाग म्हणजे राजकीय सबलीकरण होय.

आजही महिलांना अपेक्षित राजकीय फायदा मिळाला नाही. आजही महिलांना राजकीय, शैक्षणिक, प्रशासकीय क्षेत्रात योग्य स्थान मिळाले नाही. तरीही महिला पूर्णतः व्यवस्थेपासून उपेक्षित आहेत असेही नाही. पुरुष प्रधान व्यवस्थेचे स्वातंत्र्यानंतर महिलांना स्वतःच्या विकासासाठी सहकार्य मिळाले. परंतू आज यापेक्षा अधिक सहकार्य मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जाते. भारतीय संविधानात प्रारंभापासुनच महिलांना प्रत्येक क्षेत्रात प्रगती आणि विकासासाठी समान संधी देण्याची तरतुद आहे. जर

ISSN - 2319- 8648
Vol I Issue VIII, Aug. 2016 to Jan. 2017

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded

समाजातील सर्व वर्गांनी सहकार्यात्मक दृष्टीकोन स्विकारला तर महिला प्रत्येक क्षेत्रात पुरुषा समान प्रगति करु शकतील याबाबत कांही शंका नाही. तसेच त्या राष्ट्र विकासात समान भागीदार बनु शकतात. संविधानातील समान संधीचे तत्व आणि वास्तवतेत अधिक अंतर आहे. एकीकडे आम्ही म्हणतो की, स्वातंत्र्यानंतर आमच्या देशाची शासन यंत्रणा व राज्यकारभार राज्यघटनेनुसार चालतो. जर हे सत्य असेल तर घटनात्मक तरतुदीनुसार महिलांचा विकास व प्रगती का झाली नाही ? याचा अर्थ आमच्या राज्यकर्त्यांनी आजपर्यंत देशाचा राज्यकारभार राज्यघटनेनुसार चालवण्याचे चित्र रेखाटले किंवा राज्यघटनेतील तत्वांना आपल्या राजकीय व सामाजिक हितानुसार मुरड घालुन वापरले. ज्यामुळे घटनाकारांना अपेक्षित असलेले महिलांचे हित व कल्याण मागील ६९ वर्षात साध्य झाले नाही. उलट जेन्डर डेव्हलपमेंट व क्राईम रिपोर्टची अलिकडील आकडेवारी अधिक चिंताजनक स्थितीचे सत्य समोर आणते.

**महिलांचा राजकारणाविषयी पांरपारिक दृष्टीकोन :-**

भारतीय धर्मशास्त्राने व रुढीवादी समाज व्यवस्थेने महिलांच्या सामाजिक व राजकीय संचारविषयी नकारात्मक व संकुचित दृष्टीकोन स्विकारला. ज्याचे अनुकरण पुरुषासह महिला ही करतात. भारताच्या प्राचीन इतिहासापासून आज पर्यंत यासर्व बंधनाना झुगारुन देवून काही महिलांनी आपले राजकीय योगदान बजावले आहे. उदा. कैकयी, कुंती, मंथरा, द्रौपदी, जिजाबाई,येसुबाई, ताराबाई, अहिल्याबाई होळकर, ताईसाहेब राणी सरकार(कोल्हापूर), बायजाबाई शिंदे (ग्वाल्हेर), राणी लक्ष्मीबाई, कित्तुरची राणी चन्नमा, रमाबाई रानडे, यशोदाबाई भट्ट, पारूबाई दास्ताने, पार्वतीबाई ठकार, यसुबाई सावरकर इ. आज महिला राजकारण गलिच्छ आणि अनैतिक मानून त्यापासून दुर रहात आहेत. त्यांच्यामते राजकारणात सक्रियता म्हणजे चारित्र्याचे हणन आणि समाजातील प्रतिष्ठा नष्ट होणे. बिहार, उत्तरप्रदेश, पूर्वोत्तर राज्यासह अनेक राज्यातील महिला राजकारणात सहभागी होवून आपले नैतिक पतन आणि सामाजिक मूल्य कमी करु इच्छित नाहीत. पुरुषप्रधान राजकारणात सहभागी होवून आपले स्त्रित्व नष्ट होईल याची भिती स्त्रियांना असते. त्यामुळे प्रारंभिक काळात महिलांचा राजकारणातील सहभाग नगण्य होता. जो असायचा तो फक्त सही व उपस्थिती पुरताच मर्यादित.

आधुनिक समाजात माहिती तंत्रज्ञान, शिक्षण व नोकरीच्या परिस स्पर्शाने महिलांच्या राजकीय जाणीवा अधिक विकसित झाल्या. त्याची निश्चित अशी वैचारिक बैठक स्पष्ट झाली. त्यामुळे मध्यम वर्ग आणि उच्च-मध्यम वर्गातील महिलांनी महिलांच्या राजकारणाविषयीच्या पारंपारिक व सांस्कृतिक बंधनाना विरोध केला. त्याविरूध्द संघर्ष करुन त्यापुढे येवू लागल्या.

महिलांचा प्रशासकीय नौकरी व शिक्षणातील पदवी प्राप्तीसाठी आखिल भारतीय आणि राज्य स्तरावर आयोजित सर्व परिक्षातील सहभागात वाढ झाली. त्यातील महिलांच्या उत्तीर्णतेचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत अधिक आहे. वर्तमान युगातील मुली पारंपारिक शिक्षण व नौकरी ऐवजी पोलिस, इंजिनियरिंग, सैन्य, न्यायालय, माहिती तंत्रज्ञान, डॉक्टर इ. क्षेत्रात पुढे येत आहेत. महिलांचा राजकारणापेक्षा वरील क्षेत्रातील वाढता सहभाग त्यांच्या राजकीय सहभाग व उत्तरदायित्वास कमी करण्याचे एक महत्वाचे कारण आहे.

**भारतीय संविधान आणि महिला :**

९ डिसेंबर १९४६ रोजी गठित झालेल्या संविधान सभेने संविधानात महिलांच्या अधिकार व संरक्षणाविषयी तरतुद करण्याबाबत सांगोपांग चर्चा केली. लोकशाही शासन व्यवस्था स्विकारणाऱ्या देशात सर्वांना समान संधी, समान अधिकार, समान न्याय, समान मत, समान मूल्य देणे क्रमप्राप्त असते. ते देताना जात,धर्म, लिंग, प्रदेश या आधारावर भेदभाव करता येत नाही. घटनाकारांनीही अपेक्षेप्रमाणे स्त्री-पुरुष असा फरक केला नाही. पुरुषासमान स्त्रियांनाही समान संधी, समान अधिकार दिले. त्यांचा योग्य विकास व्हावा यासाठी संविधानात कांही विशेष तरतुदी करण्यात आल्या. भारतीय संविधान दुसऱ्या महायुध्दानंतर नव स्वतंत्र

झालेल्या राष्ट्रापैकी महिलांना स्वातंत्र्यापासूनच राजकीय अधिकार देणारे संविधान व राष्ट्र आहे.

भारतीय संविधानाने महिलांना पुरुषांच्या बरोबरीने सुविधा व संधी दिली आहे. ती पुढीलप्रमाणे

कलम १५ - लिंग, धर्म, जात व जन्म स्थान इ. आधारावर भेदभाव न करणे.

कलम १६ - लोकसेवात विना भेदभाव संधीची समानता.

कलम १९ - समान रुपात विचार व अभिव्यक्ति स्वातंत्र्य.

कलम २१ - समान रुपात प्राण आणि शारिरीक स्वातंत्र्यापासून वंचित न ठेवणे.

कलम ४० - पंचायतीराज संस्थात ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार आरक्षणाची व्यवस्था.

कलम ४२ - बाळंतपणात सहाकार्यांची व्यवस्था.

कलम ४७ - पोषण आहार, जीवन स्तर आणि लोक आरोग्याचे दायित्व.

मुलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्वात महिलांसाठी पुरुषासमान किंवा त्यापेक्षा अधिक सुविधांची नोंद करण्यात आली. अशा प्रकारे भारतीय संविधानात सर्व स्त्री आणि पुरुषांना समान प्रमाणात शोषणापासून बचाव, धार्मिक स्वातंत्र्य, संस्कृती व शिक्षण इ. सर्व अधिकार समान रुपाने प्रदान केले. या अधिकाराचे हणन व अतिक्रमण झाल्यास न्यायालयात दाद मागण्याचा हक्क सर्वांनाच आहे.त्यामुळे त्यांना अधिकारापासून कोणी वंचित करु शकणार नाही. त्रिस्तरीय ग्रामीण पंचायत राज व्यवस्था व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थात सर्व प्रकारच्या महिलांना १/३ पदावर आरक्षण देण्यासाठी ७३ व ७४ वी घटनादुरुस्ती करण्यात आली. ज्यामुळे देशातील त्रिस्तरीय पंचायत राजव्यवस्थेत जवळपास ८० लाख महिलांना लोकप्रतिनिधी म्हणून राजकारण आणि प्रशासनात सहभाग नोंदवण्याची संधी प्राप्त झाली. संसदआणि राज्य विधानमंडळात १/३ आरक्षण देण्याच्या हेतूने घटनादुरुस्ती करण्याचे प्रयत्न होत आहेत. त्या दिशेने आवश्यक ती जागृती होत आहे. दि.५ मार्च २०१६ रोजी नवी दिल्ली येथे राष्ट्रपती प्रणव मुखर्जीनी महिला लोकप्रतिनिधींच्या पहिल्या राष्ट्रीय संम्मेलनांचे उदघाटन करतांना महिलांच्या प्रतिनिधीत्वाशिवाय महिला सबलीकरण शक्य नाही असा विचार मांडला तसेच भारतातील सर्व राजकीय पक्षांची मुख्य जबाबदारी आहे की त्यांनी महिलांना कायदेमंडळात ३३% आरक्षण देण्याचे विधेयक पास करावे. तरच भारतीय लोकशाही बळकट होईल.

**महिला सबलीकरण आणि कायदे :-**

महिलांना संविधानाद्वारे मिळालेल्या समानतेच्या सर्व अधिकारास वास्तवतेत आणण्यासाठी आणि त्यास विशेष सुरक्षा देण्यासाठी कांही विशेष कायदे बनवण्यात आले. स्त्रीभ्रुण गर्भावस्थेतच नष्ट करण्याच्या उद्देशाने होणारी प्रसुती पूर्व लिंग निदान चाचणीला पायबंद घालनारा कायदा १९९४ बनवण्यात आला. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यास १० ते १५ हजार रुपये दंड आणि तीन ते पाच वर्षापर्यंत शिक्षेची तरतुद करण्यात आली. महिलांना वेश्यावृत्ती पासून मुक्त करण्यासाठी १९५६ साली वेश्या व्यवसाय निवारण अधिनियम बनवण्यात आला. अपराध्यांना कठोर शिक्षा करण्यासाठी आणि सक्तीने त्याचे पालन व्हावे म्हणून १९८६ साली त्यात संशोधन करण्यात आले. हुंडा पध्दतीस बंद करण्यासाठी १९६१ साली हुंडा पध्दती विरोध कायदा बनवण्यात आला. त्यातही वर्तमान परिस्थितीनुरुप बनवण्यासाठी १९८६ साली संशोधन करण्यात आले. काम करणाऱ्या महिलांना बाळंत पूर्व आणि नंतर आरोग्याच्या सुविधा मिळण्याबाबतचा कायदा करण्यात आला. स्थानिक स्वराज्य संस्थात ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार महिलांना ३३% आरक्षण देण्याचे विधेयक १९९३ व १९९४ साली पारित केले. लहान वयातील मुलींच्या विवाहावर बंदी आणणारे विधेयक १९८६ साली बनवण्यात आले. १९७० साली अल्पवयीन महिला कामगारांकडून मळ्यात सकाळी सहा ते सायं सात या नंतर काम करुन घेण्यावर प्रतिबंध करणारे विधेयक बनवले. १९८६ साली बीडी आणि सिगारेट बनवणाऱ्या महिलांच्या मुलींची व्यवस्था कामाच्या ठिकाणी व्हावी म्हणून शिशु सुधारगृह बनवण्याचे विधेयक पास करण्यात आले.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

वरील विधेयका व्यतिरिक्त समान स्वरुपाच्या कार्यासाठी महिलांना पुरषांच्या बरोबरीने समान मोबदला उपलब्ध करावा यासाठी १९७६ साली समान वेतन अधिनियम बनवले. १९८६ च्या महिला अश्लिल प्रदर्शन अधिनियमाद्वारे जाहिरात, फलक आणि इतर प्रसार माध्यमांतून महिलांचे अश्लिल चित्रीकरण व प्रदर्शनास प्रतिबंधित करण्यात आले. विवाहीत महिलेचा पती वारला असता तीला पतिसोबत जिवंत जाळण्याच्या वाईट सथीप्रथेला नियंत्रित करण्यासाठी १९८७ साली सती प्रतिबंध कायदा बनवला. या कायद्या व्यतिरिक्त विवाहित महिलेसोबत क्रुरतेने वर्तन करणे, विवाहासोबतचे इतर गुन्हे, अपहरण, खर्चा व पालन-पोषणाचा अधिकार, पोलीसांकडुन तपासणे कैद इ.शी संबंधित बनवण्यात आलेल्या इतर विशेष कायद्याद्वारे महिलांच्या हिताचे रक्षण आणि त्यांच्या विकासासाठी उपयुक्त पाउल उचलण्याच्या उद्देशाने व शासनास सल्ला देण्यासाठी इ.स.१९९३ मध्ये देशात राष्ट्रीय महिला आयोगाचे गठन करण्यात आले.

काम किंवा मजूरी करणाऱ्या महिलांना विशेष सुरक्षा आणि सुविधा उपलब्ध करण्याच्या उद्देशाने शासनाने विशेष कायदे बनवले. १९७९ च्या आंतराज्यीय प्रवासी कर्मचारी अधिनियमानुसार कांही विशेष नियोजनांत महिलांसाठी शौचालय व स्नान गृहांची स्वतंत्र व्यवस्था करण्याची आवश्यकता असणारे अधिनियम बनविण्यात आले. १९७० च्या ठेकेदारी अधिनियमानुसार फक्त दिवसा जास्तीत जास्त ८ तास काम घेण्याची अवधी निर्धारित करण्यात आली. अशा प्रकारे अन्य अधिनियमाद्वारे खाणी, मळे, बीडी कारखाने इ. ठिकाणातील महिलांसाठी विशेष सुविधा आणि सुरक्षात्मक उपाय निश्चित करण्यात आले.

**महिला सबलीकरण : शासकीय योजना व कार्यक्रम :-**

महिलांच्या सबलीकरणासाठी अनेक कायद्याच्या माध्यमातून त्यांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यात आले. तसेच त्यासाठी शासनामार्फत अनेक विकास कार्यक्रम आणि कल्याणकारी योजनांचे संचलन करण्यात आले. तसेच स्वातंत्र्यापासून ते २०१६ च्या अंदाज पत्रकात महिला सबलीकरणासाठी आर्थिक तरतुदही करण्यात आली. जेणेकरून त्यांचा जीवन स्तर सुधारेल. त्यांच्या विकासातील त्यांचे योगदान स्पष्ट होईल. केंद्रीय समाज कल्याण बोर्ड महिला आणि बाल कल्याण व विकास विभाग आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, श्रम मंत्रालय, गृह मंत्रालय, ग्रामीण विकास मंत्रालय इ. द्वारे महिलांसाठी अनेक उपयोगी कार्यक्रम आणि योजना बनवण्यात आल्या. महिलांना अर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी आणि त्यांचे उत्पन्न वाढावे म्हणून शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षणाचे अनेक संक्षिप्त कार्यक्रम बनवण्यात आले. संकटग्रस्त महिलांच्या पुनर्वसनासाठी प्रशिक्षण केंद्राची स्थापना, कामकाज करणाऱ्या महिलांसाठी छात्रवासाची व्यवस्था, कौटुंबिक समस्या, मानसिक ताण - तणाव, सामाजिक अत्याचार,शोषणग्रस्त महिला आणि मुलींसाठी अल्पावधी निवास गृहाची स्थापना यासारखे अनेक महत्वपूर्ण प्रयत्न केले जात आहेत. महिलावरील अत्याचार रोखणे, सामाजिक जाणिवा आणि जागरुकता निर्माण करण्याच्या हेतूने प्रसार माध्यमांचा पुरेपूर वापर केला जातो. महिलांच्या शैक्षणिक विकासा संबंधी कार्यक्रमामुळे त्यांच्या साक्षरता प्रमाणात सुधारणा होत आहे. वर्तमान साक्षरता मागील १० वर्षाच्या ३९.२९% पेक्षा ५४.१६% बनली आहे. २०११ च्या जणगणनेत प्रकाशित आकडेवारीनुसार साक्षरता दर ७४.०४ प्रतिशत आहेत. ज्यात महिला साक्षरता प्रमाण ६५.४६ टक्के आहे. अशाप्रकारे मागील एक दशकात १४.८७ ची वाढ झाली. भविष्यात अशाच पध्दतीने महिलांचा साक्षरता दर वाढला तर लवकरच महिलांच्या साक्षरतेच्या प्रमाणात चांगली वाढ होईल.

देशाला सक्षम व स्वावलंबी बनवण्यासाठी महिलांना रोजगार देणे, कार्य करण्यासाठी पोषक वातावरण आणि शिक्षणाची व्यवस्था करण्याच्या हेतून कायदे आणि नियमांची निर्मिती करुन त्यांना लागू करणे. तसेच अनेक कल्याणकारी योजना कार्यान्वित करुन त्यांचा विकास, कल्याण आणि प्रगती या हेतुने अनेक स्तरावर प्रयत्न केले जातात. महिलांवर आन्याय व अत्याचार करणाऱ्यास भारतीय दंड संहितेच्या ३०४ वी, ३१२-३१६, ३१९-३२३, ३४०, ३४४, ३५४, ३६१, ३६३ ए, ३६४, ३६६, ३६६ इ,

३६६बी, ३६२-३७३, ३७६, ३७६ इ, ३७६ बी, ३७६ डी, ३७७, ४९४, ४९६, ४९८ इ, ४९९, ५०९, विभिन्न कलमातर्गत कठोर शिक्षा निर्धारित करण्यात आली. ज्यात अनेक गुन्ह्यासाठी दोन वर्षापासून आजन्म कारावासपर्यंतची शिक्षा निर्धारित करण्यात आली.

स्वातंत्र्यापासून ते आजपर्यंत महिलांच्या सक्षमीकरणासाठी भारत शासनाकडून अनेक योजना बनवण्यात आल्या. ग्रामीण भागातील महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करत, त्यांचे आरोग्य, शिक्षण, पोषक आहार, स्वच्छता आणि बालकांच्या देखभालीसाठी मुलभूत सेवा प्रदान करण्याच्या हेतूने १९९९-२०००पासून स्वर्ण जयंती स्वरोजगार योजनेत सहभागी केले. ग्रामीण भागातील महिलांना रोजगारांची संधी उपलब्ध करण्याच्या हेतूसाठी आर्थिक मदत, प्रशिक्षण आणि अनुदान देवून स्वावलंबी बनवणारी न्यु मॉडल चरखा योजना १९८७. महिलांना विविध व्यवसाय उदा. ब्लॉक प्रिंटींग, स्क्रीन प्रिंटींग इ. चे प्रशिक्षण देवून आर्थिक संपन्न बनवणारे १९९० चे नोराक प्रशिक्षण योजना. ग्रामीण भागातील महिलांच्या समता ओणि सजगतेसाठी शिक्षणाची सर्व व्यवस्था करणारी महिला समाख्य योजना १९८९. १९९२ साली मातृ आणि स्वास्थ कार्यक्रमातून माता आणि पाल्यासाठी पोषक आहार उपलब्ध करणारी आणि सुरक्षित मातृत्व व लसीकरण करणारी योजना. गरीब कुटुंबातील बालिकांना संपूर्ण स्वास्थ व पोषण आणि शिक्षणाची सर्व व्यवस्था करणारी १९९२ ची किशोरी बालिका योजना ग्रामीण भागातील महिलांमध्ये बचतीची सवय लावून त्यांना सशक्त बनवण्याच्या उद्देशाने १९९३ साली महिला समृध्दी योजना बनवण्यात आली. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील महिलांचे उत्पन्न वाढावे, आर्थिक व सामाजिक परिवर्तन व्हावे या हेतूने कर्ज देण्याबाबत १९९३ साली राष्ट्रीय महिला कोष योजना बनवण्यात आली. तसेच बचत गटाच्या स्थापनेसाठी त्यांना प्रोत्साहीत करण्याचे प्रयत्न करण्यात आले. ग्रामीण आणि शहरी भागातील गलिच्छ वस्त्यातील महिलांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी १९९५साली इंदिरा महिला योजना बनवण्यात आली. महिलांनी स्वत: उद्योग चालू करावा म्हणून बँकाकडून कर्ज आणि मार्जिन मनी उपलब्ध करुन त्यांना आर्थिक विकासाची संधी उपलब्ध करणारी १९९५ ची मार्जिन मनी कर्ज योजना. ग्रामीण महिलांच्या योगदानात वाढ करने, त्यांना जागरुक बनवणे व भेदभाव नष्ट करण्याच्या हेतून १९९६ साली ग्रामीण महिला विकास परियोजना बनवण्यात आली. दारिद्र्य रेषेखालील बालिका आणि महिलांना कोणताही हप्ता न भरता अपंगत्वाच्या स्थितीत सन्मानाने जगता यावे व आर्थिक सक्षमता वाढावी या हेतूने १९९७ साली राज राजेश्वरी वीमा योजना बनवली. अनुसुचित जाती व जमातीच्या महिलांना प्रजनन आणि बाल आरोग्य विषयात आवश्यक प्रशिक्षण देवून त्यांना आर्थिक लाभ मिळवून देणारी १९९७ ची स्वास्थ सखी योजना .दारिद्र्य रेषेखालील कुटुंबात जन्म घेतलेल्या मुलींच्या आईस पौष्टीक आहार, त्या मुलीच्या १० वी पर्यंतच्या शिक्षणासाठी नगदी शैक्षणिक अनुदान देवून सहाकर्य करणारी १९९७ ची बालिका समृध्दी योजना. शहरी भागातील महिलांना आर्थिक व सामाजिक विकासाची संधी प्राप्त करुन देणारी १९९७ ची डवाकार योजना. महिलांना बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या सशक्त बनवण्याचे प्रयत्न करणारी १९९८ ची महिला सशक्तीकरण योजना. तरुण वयातील बालिकांच्या आरोग्य आणि पालण पोषणासाठीची संपूर्ण व्यवस्था करुन त्यास विकासाची सर्व संधी उपलब्ध करणारी २००० ची किशोरी शक्ति योजना. महिलांच्याअधिकारासाठी संघर्ष करणारी महिलांना राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करुन प्रोत्साहन देणारी २००० ची स्त्री शक्ति पुरस्कार योजना. महिलांचे बचत गटांना संघटित करुन त्यांना आर्थिक व सामाजिक दृष्ट्या सशक्त बनवण्याच्या हेतूने उदयास आलेली २००१ ची स्वंय सिंधु योजना. महिलांच्या आर्थिक विकासासाठी मदत करणारी २००१ ची स्वाधार योजना.याशिवाय डॉ.मनमोहन सिंग सरकारने आणि वर्तमानातील नरेंद्र मोदी यांच्या शासनाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी विशेष प्रयत्न केले. मन की बात मधून नरेंद्र मोदीनी सेल्फी काढण्याचा मार्ग सांगितला. तसेच बेटी बचाव, बेटी पढाव चा नारा दिला.

अलिकडील काळात बलात्कार, कौटुंबिक हिंसाचार, ऑनर किलींग व महिलामध्ये दहशतवादी संघटनांचे आकर्षण

INDIAN THINKER
Half yearly Research Journal 67 ISSN - 2319- 8648
Vol I Issue VIII, Aug. 2016 to Jan. 2017

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

वाढत आहे. त्यांच्या जीवीताची सुरक्षितता कुटुंबातही धोक्यात येत आहे. दररोजच्या वर्तमानपत्र, न्युज चॅनेल्समधून महिलावरील वाढत्या अत्याचाराच्या बातम्या पहायला मिळतात. वर्तमान खाऊजा व्यवस्थेत स्त्रीकडे शोषणाचे साधन व पुरुषी वासना शमणवारी वस्तु म्हणून पहाण्याचे प्रमाण वाढले. सरळ सरळ खुले आम मॉल्समधून देह विक्रीचा व्यवसाय होतो. या सर्वांवर ठोस उपाय करणे वर्तमान शासनासमोर आव्हान आहे. स्त्रीभ्रूण हत्येसारखे प्रकार पुरोगामीत्वाचा प्रचंड ऐतिहासीक व सांस्कृतिक वारसा असणाऱ्या देशात घडत आहेत. क्राईम पेट्रोल डायल १००, दस्तक, लक्ष्य, सावधान इंडिया या मालिकातुन स्त्रीयावरील अन्याय व अत्याचाराचे चित्रीकरण समाजासमोर प्रदर्शीत केले जात आहे.

**महिला सबलीकरण आणि राजकीय सहभाग :-**

निवडणुका दरम्यान प्रत्येक राजकीय पक्ष संविधानातील स्त्री सक्षमीकरणाच्या तत्वाची आण घेवून महिला सबलीकरणाविषयी अनेक घोषणा करतात. परंतु सत्ता प्राप्तीनंतर त्यास पुर्ण करताना कानाडोळा केला जातो. वर्तमानात महिलांना त्यांचे अधिकार बहाल करण्याबाबत राजकीय पक्षांचा व्यवहार बदलत असल्याचे निदर्शनास येते. महिलांचा राजकारणातील सहभाग पुर्वीपेक्षा अधिक वाढला आहे.महिलांना आरक्षण देण्याबाबत सर्व राजकीय पक्षात एक वाक्यता दिसत नाही. कांही राजकीय पक्ष आजही आपल्या अजेंड्यात महिलांना दुय्यम स्थान देतात. महिलांकडे उपेक्षित नजरेने पाहतात. परंतू वर्तमानात महिलांनी आपली प्रतिभा, क्षमता, गुणवत्ता व कार्यतत्परतेच्या जोरावर राजकारणातील आपले स्थान महत्वाचे बनवले उदा. सोनिया गांधी, शीला दिक्षित, मायावती, अंबिका सोनी, वृंदा करात, रेणुका चौधरी, जयललिता, उमा भारती, पंकजा मुंडे, आनंदी बेन पटेल, सुषमा स्वराज, स्मृती इरानी, सुमित्रा महाजन इ. वर्तमान राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षातील बऱ्याच पक्षांचे पक्षाध्यक्ष हे पद महिलांकडे आहे. उदा. कॉंग्रेस - सोनिया गांधी, तृणमुल कॉंग्रेस - ममता बॅनर्जी,अण्णाद्रमुक - जयललिता, मायावती - बहुजन समाज पार्टी इ. या सर्व महिलांच्या आदेशाचे पालन पुरुष कार्यकर्ता प्रामाणिकपणे आणि निष्ठेने करतात. बऱ्याच वेळी कार्यकर्ते या महिलांच्या आदेशावरून आपल्या प्राणाची आहुती देण्यास तयार होतात. महिलांना आपल्या स्वप्नांना वास्तवतेत बदलण्यासाठी योग्यता, मेहनत आणि तपस्येने राजकारणात काम करावे लागेल. मदर तेरेसा, मेघा पाटकर, सिंधूताई सपकाळ, साधना आमटे इ. महिलांनी सामाजिक क्षेत्रात महत्वाचे काम केले आहे.भारतात महिलांनी राजकारणात फार कमी पण उल्लेखनीय व जगाने नोंद घ्यावी अशी भुमिका बजावली. उदा. विजयालक्ष्मी पंडीत, इंदिरा गांधी, सुचिता कृपलानी, सरोजनी नायडू, सोनिया गांधी इ. मागासलेल्या भागात महिला असुन नसल्याप्रमाणे आहेत. राजकारणात सहभागी होणाऱ्या महिलांनी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या राजकारणातील अनुभवाची शिदोरी पाठीशी बाळगली तर त्यांना पावलो-पावली धोका होणार नाही. वास्तवतेत प्रत्येक क्षेत्रात महिला पुरुष वर्गापेक्षा अधिक काम करताना दिसतात. उदा. IT, कृषी क्षेत्र इ. जर अधिकाधिक महिलांनी राजकारणात सहभाग नोंदवला तर महिलांची स्थिती अधिक मजबुत होईल. राजकारणातील नैतिकतेचा दर्जा वाढेल. त्यांच्या सोबत होणाऱ्या अत्याचारापासून त्यांची सुटका होईल. भ्रष्टाचार विरहीत पारर्शक शासन व प्रशासन निर्माण होईल. वर्तमान काळातही महिलांची व्यवस्थेकडून उपेक्षा होते. फक्त तीच्या स्वरुप व पध्दतीत बदल झाला. आज महिलेने आपल्या योग्यता व क्षमतेच्या आधारे राजकीय पक्षात महत्वाची भुमिका बजावली आहे. त्यामुळे आज आपण म्हणू शकतो की स्त्री विना राजकारण व राजकीय प्रक्रिया आज शक्य नाही.

भारतातील महिला सबलीकरणाविषयी विचार करता वरील सर्व बाबींचा अभ्यास महिलांचा संसदेतील योगदानाच्या अभ्यासाशिवाय पुर्ण होवु शकत नाही. त्यामुळे भारतात १९५२ ते २०१४ च्या संसदेत महिलांची स्थिती समजून घ्यावी लागेल. २००४ च्या लोकसभा निवडणुकीत संसदेपर्यंत जाणाऱ्या महिलांचे प्रमाण १०% वर गेले नाही. परंतू १५व्या लोकसभेत १०.८% महिला लोकसभेत पोहचल्या. लोकसभा आणि विधानसभेतील महिलांचे प्रतिनिधीत्व वाढवण्यासाठी मागील कांही वर्षापासून महिला संघटनामार्फत प्रयत्न होत आहेत. सर्व राजकीय पक्ष या विषयावरआपले एकमत करत आहेत १९५२-२०१४ लोकसभेत

महिलांची संख्या १९ पासून ६१ पर्यंतच राहिली.

लोकसभेतील महिलांचा सहभाग

| वर्ष | एकुण जागा | महिला उमेदवार | विजयी महिला उमेदवार | लोकसभेतील टक्केवारी | एकूण महिला उमेदवारांच्या तुलनेतील टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १९५२ | ४८९ | - | २२ | - | - |
| १९५७ | ४९४ | ४५ | २७ | ४.४५ | ४८.८९ |
| १९६२ | ४९४ | ६६ | ३४ | ६.२७ | ४६.९७ |
| १९६७ | ५२० | ६७ | ३१ | ५.५७ | ४३.२८ |
| १९७१ | ५२० | ८६ | २२ | ४.०५ | २४.४१ |
| १९७७ | ५४२ | ७० | १९ | ३.५० | २७.१४ |
| १९८० | ५२९ | १४३ | २८ | ४.२९ | १९.५८ |
| १९८४-८५ | ५४२ | १७१ | ४४ | ७.९४ | २५.१४ |
| १९८९ | ५२३ | १९८ | २९ | ५.४८ | १४.६४ |
| १९९१ | ५३६ | ३३० | ३९ | ७.११ | ११.५१ |
| १९९६ | ५४३ | ५९९ | ३६ | ७.३६ | ६.६८ |
| १९९८ | ५४३ | २७४ | ४३ | ७.९१ | १५.६९ |
| १९९९ | ५४३ | २८४ | ४९ | ९.०२ | १७.२५ |
| २००४ | ५४३ | ३५५ | ४४ | ८.२९ | १२.६८ |
| २००९ | ५४३ | ५५६ | ५९ | १०.८६ | १०.६१ |
| २०१४ | ५४३ | ६३१ | ६२ | ११.०० | - |

आधार - विचारशलाका - ऑगस्ट २०१४ ते जानेवारी २०१५ - पृष्ठ क्र.५८

वरील सर्व आकडेबारी राजकारणात महिला पुरुषापेक्षा किती पाठीमागे आहेत ते स्पष्ट करते.महात्मा बस्वेश्वरांनी १२ व्या शतकात स्थापन केलेल्या संसदरुपी अनुभवमंटपात ७७० सदस्यांपैकी ७० महिलांना सभासदत्त्व दिले. त्यांना आत्मनिर्भर बनवले. तेही राजेशाही व सरंजामशाहीच्या युगात. लोकशाहीत आपणास ६९ वर्षांनंतर १०% महिलांना संसदेत प्रतिधित्व देता येत नाही. ज्या देशात महिला मतदारांची संख्या एकुण लोकसंख्येच्या जवळपास अर्धी आहे. परंत लोकसभेत त्यांचे १०% ही प्रतिनिधीत्व नाही ही लोकशाहीची चेष्टा आहे. अनेक राजकीय पक्ष निवडणुकादरम्यान उमेदवारी देतांना महिलासोबत भेदभाव करतात,

ISSN - 2319-8648
Vol I Issue VIII, Aug. 2016 to Jan. 2017
ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

त्यामुळे महिला राजकारणात बॅकफुटवर आहेत. एका बाजूने लोकसभेत महिलांना ३३% आरक्षण देण्याच्या विषयावर चर्चा होते. त्याविषयी अनेक आश्वासने दिली जातात. २००९ मध्ये काँग्रेस पक्षाने आपल्या पक्षाच्या संघटनेत पदाधिकारी स्तरावर महिलांना ३३% आरक्षण देण्याचा निर्णय घेतला. परंतू ४५३ जागेत फक्त ५० महिलांना तिकिट दिले त्यापैकी फक्त १५ महिलांनीच निवडणूकी जिंकली. भारतीय जनता पक्षाने तर फक्त ७.५% महिलांनाच तिकिट दिले. ३३९ मध्ये फक्त २५ महिलांना तिकीट दिले व सर्वांत अधिक महिला याच पक्षाकडून निवडून आल्या. मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी ने ७३ जागांपैकी पाच आणि भारतीय कम्युनिस्ट पार्टीने ५६ जागापैकी चार महिलांना तिकीट दिले. २००९ साली केरळमधुन एका महिला उमेदवाराचा विजय झाला. समाजवादी पार्टीतून तीन, तेलगू देसम पार्टीतून तीन, तृणमुल काँग्रेस चे दोन आणि राष्ट्रीय जनता दल शिवसेना, इनलो आणि नॅशनल कॉग्रेस पार्टीच्या एक-एक महिला उमेदवाराने निवडणूक लढली. तामिळनाडुतून अन्नाद्रमुकच्या डॉ.बी.सरोज दुसऱ्यांदा निवडणुक जिंकून लोकसभेत पहुंचल्या. पश्चिम बंगालच्या पंसकुडा मतदारसंघातुन सात वेळेस गीता मुखर्जी, मध्यप्रदेशच्या इंदौरमधुन पांचवी वेळेस सुमित्रा महाजन यांनी निवडणुक जिंकली. ज्या सध्या लोकसभेचा अध्यक्षा आहेत. लोकसभेच्या पहिल्या महिला अध्यक्ष होण्याचा बहुमान मीरा कुमार व नंतर सुमित्रा महाजन यांना मिळाला. आपल्या हिमतीवर निवडणुक जिंकणाऱ्या मेनका गांधीनी महिला राजकारणात येवुन कांहीच करत नाहीत हा समज खोटा ठरवला. जेंडर डेव्हलपमेंट च्या टर्म मध्ये १६२ देशात भारताचे स्थान ११५ क्रमांकावर आहे.

## महाराष्ट्र विधानसभेतील महिलांचा सहभाग

| वर्ष | एकूण आमदार | महिला आमदार | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १९६२-१९६७ | २६५ | १७ | ६.४१ % |
| १९६७-१९७२ | २७१ | १२ | ४.४२ % |
| १९७२-१९७७ | २७१ | २८ | १०.३३ % |
| १९७७-१९८० | २८९ | ०८ | ०२.७६ % |
| १९८०-१९८५ | २८९ | २० | ०६.९२ % |
| १९८५-१९९० | २८९ | १६ | ०५.५३ % |
| १९९०-१९९५ | २८९ | ०६ | ०२.०७ % |
| १९९५-१९९९ | २८९ | १३ | ०४.४९ % |
| १९९९-२००४ | २८९ | १२ | ०४.१५ % |
| २००४-२००९ | २८९ | ११ | ०३.८० % |
| २००९-२०१४ | २८९ | ११ | ०३.८० % |
| २०१४-२०१९ | २८८ | १२ | ०४.१६% |

देशाच्या माजी पहिल्या महिला राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी १९६२ च्या निवडणुकीत विधान मंडळातील महिला प्रतिनिधीची मुहुर्तमेठ रोवली. १९७२ ते १९७७ या काळात एकूण २८ महिला आमदार म्हणून निवडून येण्याचा विधानसभेतील हा उच्चांकच म्हणावा लागेल. कारण त्यानंतर सातत्याने महिला आमदारांची संख्या कमी झाली. रजनीताई पाटील, सुप्रिया सुळे (लेक वाचवा अभियान), अमिता चव्हाण, डॉ. निलम गोरे, प्रा.फौजिया खान, विमल मुंदडा, प्रा.सुशिला मोराळे, मिरा रेंगे, सुर्यकांता पाटील, पंकजा मुंडे, वर्षा गायकवाड, केशरकाकु क्षिरसागर, शरद चंद्रीका पाटील, पुनम महाजन, प्रिया दत्त, प्रणिती शिंदे, भावना गवळी, डॉ.शोभा बच्छाव, रंजना कूल, कमल ढोले पाटील, शोभा फडणवीस, रेखा खेडकर, श्वेता परुळकर, अंजली दमानिया, शालिनी ठाकरे, नंदीनी पारवेकर इ. महिला महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रीय सहभागी आहेत. चंदगड, कागल, कणकवली, कुडाळ, सावंतवाडी, दापोली, गुहागर चिपळुण, रत्नागिरी व राजापूर हे अधिक महिला मतदार असलेले विधानसभा मतदारसंघ आहेत.

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थेबाबत मिळालेल्या आकडेवारी नुसार ३३ जिल्हा परिषदातील १९५१ सभासदापैकी अनुसुचित जातीतील ७५ महिला सदस्य होत्या. अनुसूचित जमातीतील ८९ महिला सदस्य होत्या. १७ महिला जिल्हा परिषद अध्यक्ष होत्या. अनुसुचित जातीतील ७ महिला जिल्हा परिषद अध्यक्ष होत्या. अनुसुचित जमातीतील २ महिला जिल्हा परिषद अध्यक्ष होत्या. खुल्या गटातील ८ महिला जिल्हा परिषदअध्यक्ष होत्या. ३५१ पंचायत समित्यात एकुण ३९०२ सभासद होते. त्यापैकी एकूण ११६ महिला अध्यक्ष होत्या. अनुसुचित जातीतील १७६ महिला अध्यक्ष होत्या. अनुसुचित जमातीतील १४९ महिला सदस्य होत्या. खुल्या प्रवर्गातील ९७६ महिला सदस्य होत्या. अनुसुचित जातीतील १९ महिला अध्यक्ष होत्या. अनुसुचित जमातीतील १३ महिला अध्यक्ष होत्या. खुल्या प्रवर्गातील ८४ महिला अध्यक्ष होत्या. एकूण २७८९३ ग्रामपंचायती पैकी ९३२५ महिला सरपंच होत्या त्यापैकी अनुसुचित जातीतील १०४१ महिला सरपंच होत्या. सद्यस्थितीत संपूर्ण भारतात १२.७० लाख निर्वाचीत महिला प्रतिनिधी असुन त्या खुप चांगले कार्य करतात. महिलांना संसद व विधानसभात प्रतिनिधीत्व देण्याच्या बाबतीत जगातील १९० देशात भारत १०९ व्या क्रंमांकावर आहे. हे चित्र बदलले पाहिजे.

निवडणूक नियम १९२० आणि १९०९ नुसार भारतीय महिलांना विधानसभा सदस्य बनण्याचा अधिकार नव्हता. परंतू हा अडथळा कांही प्रातांच्या विधानसभांनी दुर केला. ज्या प्रांतास एका महिलेला उमेदवार बनवण्याची योग्यता प्राप्त असते. तेंव्हा ती महिला राज्यसभेचे सदस्य पण बनण्याची पात्रता प्राप्त करते. जोपर्यंत भारतीय वैधानिक आयोगाचा अहवाल सादर होत नाही तोपर्यंत महिला राज्यसभेत बसु शकत नाहीत. राज्यसभेला विधेयक पारित करण्याचा अधिकार असता तर या सर्व समस्या दुर झाल्या असत्या. परंतु परिणाम असा झाला की, राज्यसभेच्या निवडणूकीत महिला स्वतःस प्रतिस्पर्धी बनवु शकल्या नाहीत. कायदा १९३५ ने महिलांच्या या अपात्रतेस दुर करण्याचे प्रयत्न केले. महिलांना सहा आणि नऊ जागा राज्यसभा व विधानसभेत आरक्षित केल्या. Women Politicians inspire Confidence हे मत बंगालच्या माजी मंत्री रेणुका रॉय यांचे होते. ज्या १९५७ च्या निवडणूकीतील यशस्वी उमेदवार होत्या. आजही कांही क्षेत्रात महिलांना राजकारणातील परंपरागत विचारसरनीस सामोरे जावे लागते. तरी ही या क्षेत्रात सदैव महिलांचे स्वागत केलेजाते. महिलांचा एक फार मोठा वर्ग आपल्या कष्टाने, प्रयत्नाने यशस्वी होत आहे. तरीही कांही महिलांना त्यांच्या अभियानात यश मिळत नाही. याचा अर्थ असा नाही की, राजकारणातील त्यांचे स्थान व स्थिती कमकुवत बनली. राजकारणातील महिलांची उपस्थिती एक त्रिकालबाधित सत्य आहे.

महिला निवडणूकीत महत्वाची भुमिका बजावतात. मग त्या पोलिस अधिकारी, निवडणुकीतील उमेदवार किंवा अन्य भुमिकेत राहून. तेजस्विनी, राजनिती चित्रपटात महिलांची ही भुमिका दाखवण्यात आली. २०१३ विधानसभा दिल्ली निवडणुकीत महिलांनी उमेदवार प्रचारक, संघटक म्हणून योग्य भुमिका बजावली. रोहित वेमूला हत्या प्रकरण, जवाहरलाल नेहरु विद्यापीठ कन्हैया प्रकरणी, स्मृती इराणीनी लोकसभेत व राज्यसभेत विरोधी पक्ष व जनतेला दिलेल उत्तर पहाता महिलांची कणखरता स्पष्टपणे

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded



जाणवते. तरीही भारतीय समाजात महिला घराच्या चार भिंतीना आपला संसार मानतात. बाह्य जगतातील वातावरणापासून दुर राहू इच्छितात भारतीय समाज व्यवस्थेची संरचनाच असी बनवण्यात आली की, महिलांची स्वच्छंद मानसिकता पररंपरावादाच्या ओझ्याने दबुन गेली. भारतातील स्त्री निसर्गत:च कांही अधिक प्रमाणात शालीन, सभ्य, सहनशील, त्यागी व अंतर्मुखी आहे. केंव्हा-केंव्हा तर हा पंरपरागत विचार आणि सामाजिक रिती-रिवाजाचे आंधळे अनुकरण तिच्यासमोर समस्यांचा हिमालय उभा करते.

भारतीय महिला निवडणुकीत सुध्दा महत्वाची भुमिका बजावतात. मतदान करण्यात तिचा उत्साहपुर्वक सहभाग असतो. परंतु या उत्साहास उत्तम मार्गदर्शनाची गरज आहे. अशा प्रसंगी एका सुशिक्षित महिलांची आवश्यकता भासते. सुशिक्षित महिलांचे समाजातील प्रमाण नगण्य आहे. तरीही एक उत्तम मार्गदर्शकाची भुमिका बजावण्यासाठी कांही गुणांची आवश्यकता असते. आज भारतातील सुशिक्षित महिलांनी बहुसंख्य अशिक्षित महिला समुहांना मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे

महिलांचा राकारणातील प्रवेश २० व्या शतकाच्या प्रांरभापासून झाला. गांधींच्या नेतृत्वातील स्वातंत्र्य आंदोलनात महिलांचे सहभागीत्व अधिक होते. गांधीच्या दृष्टीने भारतीय महिलांची स्वतंत्र व वेगळी ओळख आहे. महिलांच्या स्वातंत्र्य आंदोलनातील सहभागाविषयी गांधी समाधानी होते. सविनय कायदेभंग, सुतकताई, स्वदेशी मोर्चा, अस्पृश्यता निवारण, मिठाचा सत्याग्रह आणि १९४२ चे भारत छोडो आंदोलनात महिलांची महत्वपूर्ण भुमिका होती. या आंदोलनात परकीय सत्तेच्या विरुध्द घोषणा देण्यासोबतच महिलांनी आपले मताधिकार आणि निवडणूकीत सहभाग घेण्याच्या अधिकारसाठीचा संघर्ष केला. या चळवळीत सहभागी होणाऱ्या रेणुका रॉय, दुर्गादेवी देशमुख, अरुणा असफअली, कमलादेवी चट्टोपाध्याय, रुक्मीणी लक्ष्मीपती, लीलवती मुंशी, सुशिला पै, प्रेमलाबाई कंटक, अवंतिकाबाई गोखले, फातमा तय्यबाजी, सरोजीनी नायडु, इ. महिला स्त्री प्रश्नांची मांडणी करु लागल्या. उच्च वर्गातील महिलांच्या सहभागास स्वातंत्र्य आंदोलनाने महत्व दिले. परंतु गरीब आणि निम्न वर्गातीन महिलांना स्थान दिले नाही. परंतु व्यवहारात त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात आपले भरपूर योगदान दिले.

१९१७ ला जेंव्हा इंग्लंडमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता. तेंव्हा सरोजीनी नायडूनी इंग्लंड संसदेत भारतीय पुरुषासोबत मिळून महिलांना मताधिकार देण्याची याचिका दाखल केली. गांधीनी १९२९ साली महिलांना ही मत देण्याचा अधिकार आहे असे मत नोंदविले. भारतीय समाजाने महिलांना प्रत्येक क्षेत्रात समान अधिकार दिले. राजकीय क्षेत्रात राज्य आणि केंद्रीय स्तरावर महिलांना सत्तेतील सहभागी बनवले. केंद्रीय स्तरावर मंत्रीमंडळात २००२, २००४ आणि २००८ ला फक्त ८ महिलांना संधी मिळाली. तर सध्या मोदी मंत्री मंडळात जवळपास पाच ते सात महिला मंत्री मंडळात आहेत तर महाराष्ट्रात फक्त पंकजा मुंडे यांचाच मंत्री मंडळात समावेश आहे. पहिल्या सर्वसाधारण निवडणूकीपासून आतापर्यंत १४ महिलांना राज्याच्या मुख्यमंत्री होण्याचा मान मिळाला. भारतात पहिल्यांदा ऑक्टोंबर १९६३ साली सुचेता कृपलानी यांना देशातील सर्वात मोठे राज्य उत्तरप्रदेशाचा मुख्यमंत्री बनवले. त्यानंतर कॉंग्रेसने नंदनी सतपते यांना ओरिसाचा मुख्यमंत्री बनवले त्या ओरिसाच्या पहिल्या आणि आतापर्यंतच्या एकमेव महिला मुख्यमंत्री म्हणून ओळखल्या जातात. गोव्यात ऑगस्ट १९७३ साली शशिकला यांना आपले वडील दयानंद यांच्या आकस्मिक निधनानंतर मुख्यमंत्री पद देण्यात आले. त्यानंतर त्या केंव्हाच मुख्यमंत्री बनल्या नाहीत. आसाम मध्ये कॉंग्रेस पक्षाने डिसेंबर १९८० साली सैय्यद अनवर तैमूर यांना मुख्यमंत्री बनवले परंतू त्या फक्त सहा महिनेच मुख्यमंत्री राहिल्या. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.जी.रामचंद्रनच्या मृत्यूनंतर ए.आई.डी.एम.के. ने त्यांची पत्नी जानकी रामचंद्रन यांना मुख्यमंत्री बनवले. त्यांनतर जयललिता यांनी बऱ्याच वेळेस तामिळनाडूच्या मुख्यमंत्री पदाचा कार्यभार स्विकारला सध्या ही त्याच तामिळनाडूच्या मुख्यमंत्री आहेत. यानंतर मायवती-उत्तरप्रदेश, पंजाब- राजेंद्र कौर भट्टल, बिहार - राबडीदेवी, दिल्ली - सुषमा स्वराज, शिला दिक्षित, मध्यप्रदेश- उमाभारती, राजस्थान - वसुंधरा राजे, पश्चिम बंगाल - ममता बॅनर्जी, गुजरात - आनंदी बेन पटेल इ. महिला मुख्यमंत्री बनल्या. वर्तमान राज्यसभेत २४ महिला संसद सभासद जनतेचे प्रतिनिधित्व करत आहेत.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्ती द्वारा महिलांना ३३% आरक्षण स्थानिक स्वराज्य संस्थेत मिळाले. ज्यामुळे १५ लाख महिलांना ग्रामपंचायत आणि शहरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकात सहभाग नोंदवण्याची संधी मिळाली . ज्यामुळे देशातील विभिन्न राज्यातील ४३% महिलांना प्रतिनिधी म्हणून निवडून येवून सबलीकरणाच्या दिशेने मार्गक्रमण होण्याची संधी मिळाली. आज जवळपास एकूण पंचायतीत २८लाख १० हजार प्रतिनिधी आहेत. ज्यात जवळपास ३६% महिला आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेत हे आरक्षण ५०% झाल्यास पंचायतीत महिलांचा सहभाग १४ लाख होण्याची शक्यता आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर विजयालक्ष्मी पंडीत यांना संयुक्त राष्ट्र संघनेच्या आमसभेतील पहिल्या महिला अध्यक्ष बनण्याचा मान मिळाला. भारताच्या ६९ वर्षाच्या इतिहासात इंदिरा गांधीनाच देशाच्या महिला पंतप्रधान होण्याची संधी मिळाली. तर प्रतिभाताई पाटील यांना पहिल्या राष्ट्रपती होण्याचा मान मिळाला. स्वातंत्र्यानंतरच्या कालावधीचा विचार करता महिलांची राजकीय क्षेत्रात अधिक सकारात्मक प्रगती झाली. युनोचे सदस्य, राज्यपाल, मुख्यमंत्री, राजदूत, विधानसभा, विधानपरिषद, लोकसभा, राज्यसभा सदस्य, लाकसभा स्पीकर सुमित्रा महाजन आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पाठवण्यात येणाऱ्या गटात सहभाग घेत आहेत. राजकारणाशिवाय डॉक्टर, शास्त्रज्ञ (कल्पना चावला, सुनिता विल्यम), पत्रकार, खेळाडू, तुरुंगाच्या निरीक्षक, विश्व सुंदरी (ऐश्वर्या रॉय, सुस्मिता सेन) इ. सर्व क्षेत्रात आपली ओळख बनवत आहेत. २१ व्या शतकातील महिलांच्या जागृती सामर्थ्यापुढे पुरुषांचे खोटे व काल्पनिक विचार निकामी ठरत आहेत. पोलिस आणि सैन्यदलातही महिलांना संधी देण्यात आली. सी. आर.पी.एफ.ची महिला बटालियन आशियातील पहिली पारा मिल्ट्री फोर्स आहे. १९७३ ला कलकत्यात पहिल्या महिला पोलिस स्टेशनची स्थापना झाली. मध्यप्रदेशात महिला पंचायतीचा श्री गणेशा झाला.

**राजकीय सहभागाच्या उदासिनतेची कारणे :-**

महिलांचे संख्येच्या प्रमाणात राजकीय प्रक्रियेतील योगदान फार कमी आहे. आपला सहभाग, प्रशासकीय क्षमता व अचुक निर्णय निर्धारणाने जनतेच्या प्रगती व विकासात योगदान देवू शकते. परंतू निर्णय निर्धारणात तिचे प्रतिनिधीत्व फक्त १०% आहे. महिलांची व्यक्तिगत, सामजिक आणि आर्थिक स्थिती त्यांच्या अत्यल्प राजकीय सहभागाचे महत्वाचे कारण आहे. महिला राजकारणाप्रती उदासीन रहातात. कारण त्यांची समाजातील कमजोर स्थिती, अज्ञान, आर्थिक स्थिती, सामाजिक बंधने, असुरक्षित वातावरण ई. आजपर्यंतच्या राजकीय जीवनात महिलांच्या सहभागाचे प्रमाण अत्यल्प आहे. महिला राजकारणाकडे गांभीर्याने पहात नाहीत. युनेस्कोद्वारा अलिकडेच दक्षिण - पुर्व आशिया देशात निवडणूक लढणे आणि मतदान करण्यासारख्या महिलांच्या राजकीय वर्तनाबाबत सर्व्हे करण्यात आला. ज्यातुन महिला राजकीय सहभागापासून दुर असल्याचे जाणवते. १९५२ साली ३८% महिलांनी मतदान केले. तर २००९ च्या लोकसभा निवडणूकीत ३४:२२ करोड महिलांनी मतदान केले. बिहार, उत्तरप्रदेश, राजस्थान या राज्यात महिला मतदानाच्या अधिकाराचा वापर फार कमी करतात. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत ८१ कोटी ४५ लाख मतदाराने मतदान केले त्यात साधारनपणे ४०% महिलांनी मतदान केले.

विकसनशील समाज अभ्यास केंद्राद्वारे १९७१ ते १९९६ दम्यान झालेल्या व्यापक राष्ट्रीय निवडणुका सर्वेक्षणाद्वारे राजकारणात सक्रिय सहभाग घेणाऱ्या महिलांचे प्रमाण १/३ आहे. निवडणूक सभातील भागीदारी वाढली. परंतू पक्षाचे सदस्य म्हणून योगदान कमी आहे. १६ व्या लोकसभा निवडणुकीतील प्रचार यंत्रणा, निवडणुक सभा, अण्णा हजारेंचे आंदोलन, अरविंद केजरीवाल यांचे दिल्ली विधानसभा निवडणुकीती अभियान, जवाहरलाल नेहरु विद्यापीठातील कन्हैया प्रकरण किंवा प्रसार माध्यमांतून समालोचक, निवेदक, न्युज रिपोर्टर, पत्रकार म्हणून कार्य करणाऱ्या महिलांकडे पहाता त्यांचा निवडणूकीच्या प्रत्येक कामातील सहभाग वाढला. परंतु त्यांचे संसदेतील प्रतिनिधीत्वात रुपांतर का होत नाही ? हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. त्या बाबत अधिक विचार करता निवडणुकीचा वाढणारा खर्च हे एक कारण आहे. १६ व्या लोकसभा निवडणूकीच्या प्रक्रियेवर ३५००

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist. Nanded

कोटी रुपये खर्च झाले. राजकीय पक्षांनी या निवडणुकात ३०,५०० कोटी रु. खर्च केल्याचा अंदाज आहे. याचा अर्थ ज्याच्याकडे पैसा तोच निवडून येतो. कुटुंबप्रमूख म्हणून आर्थिक संपत्तीची मालकी पुरुषाकडे असते. त्यामुळे तोच निवडणूक लढवतो व पैसा खर्च करतो. कुटुंब व समाजात महिलांचे दुय्यम नागरीकत्व, राजकारणावर पैसा खर्च न करण्याची स्त्री मानसिकता. जात, धर्मीय बंधनामुळे महिला सामाजिक, कौटूंबिक आणि सांस्कृतिक कार्य पाडणारी वस्तु बनली. वीणा मुजूमदारच्या मते, महिलांचा उपयोग फक्त एक साधन म्हणून केला जातो. जे फक्त सामाजिक परंपरा आणि संस्कृतीस टिकून ठेवण्याचे काम करतात. निर्णय निर्धारणास प्रभावित करण्याची क्षमता नसणे. परंतु सामाजिक मुल्यांना टिकवून ठेवण्यात त्यांचे योगदान महत्वाचे आहे. महिलांना राजकारणात आपले स्थान स्वत: बनवावे लागेल. सर्व राजकीय पक्षात आपली जागा व स्थिती महत्वाची बनवावी लागेल. बऱ्याच काळापासून मिळणारे दुय्यम दर्जाचे नागरिकत्व आणि समाजाची महिलांविषयीची उदासीनता फक्त दोन दशकात नष्ट होणार नाही.

**प्रसार माध्यम आणि महिला :-**

वर्तमान आंतरराष्ट्रीय राजकारणासह भारतीय राजकारण, समाजकारण किंवा कौटुंबिक जीवनातील प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात प्रसार माध्यमांचे महत्व वाढत आहे. प्रसार माध्यमच ठरवतात व्यक्तिची आवड-निवड गरजा शासन आणि शासन बाह्य कोणासही रातोरात संपवण्याचे व त्यास स्टार बनवण्याचे कार्य प्रसारमाध्यमे प्रामाणिकपणे करत आहेत. उदा.जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील कन्हैया प्रकरण (Feb २०१६), गुजरातमधील हार्दिक पटेलाचे आरक्षण आंदोलन, अण्णा हजारे व अरविंद केजरीवालचे लोकपाल आंदोलन, महिला बलात्काराच्या घटना इ. परंतु प्रसारमाध्यम आणि महिला असा विचार करता अनेक नवीन बाजू समोर येतात. प्रसारमाध्यम महिलांच्या चारित्र्यपूर्ण जडणघडणीत बॅकफूटवर असल्याचे जाणवते. स्वत:चा TRP वाढवण्याच्या नादात हुंडाबळी, बलात्कार, लैंगिक शोषण इ. शी संबंधीत बातम्या छापण्यातच आवड व्यक्त करतात. महिलांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन जाहिरातीतून वारंवार घडवतात. बिहार, महाराष्ट्रसह अनेक राज्यात सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात महिलाद्वारे प्राप्त केलेल्या यशाचा आलेख सांगण्यात जागरुकता दाखवत नाहीत. प्रत्येक दैनिक, साप्ताहिक, मासिक वर्तमानपत्र या प्रिंट मिडीयात स्त्रीयांसाठी वेगळी जागा (पेज) असते. जी आज प्रत्येक वर्तमानपत्रात आढळते. त्यात फक्त महिलाच्या प्रश्नांना मांडले जाते. परंतू त्या समस्येवर ठोस उपाय व्हावा यासाठीचा संघर्षयुक्त लढा उभारण्यात याचे योगदान नगण्य असते. जर प्रसार माध्यमांनी महिलांना प्रेरणादायी ठरवणाऱ्या अनेक समाजसुधारक ,शास्त्रज्ञ, खेळाडू महिलांच्या जीवन चरित्राची प्रेरणादायी मांडणी केली तर महिलांचे व्यवस्थेतील योगदान वाढते.

भारतातील अनेक इतिहासकारांनी आपल्या लिखानात महिलांच्या सामाजिक स्थितीची मांडणी केली. भारतात प्राचीन काळापासून ते आजपर्यंत अनेक राजकीय विचारवंतानी महिला विकासावर भर दिला. राजकारणातील महिला सहभागीत्वाच्या आवश्यकतेस समाजासमोर ठेवले. उदा. म.फुले,महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, न्यायमुर्ती रानडे, आगरकर, गोखले व महर्षी कर्वे इ. तरीही महिलांच्या राजकारणातील सहभागात म्हणावी तशी वाढ झाली नाही. ती व्हावी म्हणून शेवटी एका महिलेसच पुढे येवून इतर महिलांना परंपरागतता, अज्ञान, राजकारणाविषयीच्या अज्ञानतेपासून जागृत बनवावे लागेल.

वर्तमान भारताच्या केंद्र आणि राज्याच्या राजकारणातील महिलांच्या सक्रियेतेविषयी चिंतन करताना एक विडंबना जाणवते की, भारताच्या राजकीय इतिहासातील यशस्वी महिलांत अधिक प्रमाणात त्यांचेच नाव येते ज्यांचा कोणत्या ना कोणत्या राजकीय घराण्याशी संबंध आहे. मग त्या इंदिरा गांधी, सोनिया गांधी, वसुंधरा राजे सिंधीया, शीला दिक्षित, मीरा कुमार, रीटा बदुगूणा जोशी, सुप्रीया सुळे पवार, पंकजा पालवे मुंडे, पुनम महाजन, महबुबा मुफ्ती, प्रिया दत्त इ. राजघराण्याशिवाय ज्या महिलांनी राजकारणात यश मिळवले त्यातील बऱ्याच महिलांसाठी कोणत्या ना कोणत्या पुरुषाने गॉडफादर म्हणून कार्य केले. उदा. मायवती - कांसीरामचा वारसदार मानले जाते, जयललिता - एमजी रामचंद्रन, जयाप्रदा - अमरसिंह, अनुराधा चौधरी - अजित सिंह, सुषमा

ISSN - 2319- 8648
Vol I Issue VIII, Aug. 2016 to Jan. 2017

स्वराज - बंसीलाल , पंकजा मुंडे - गोपीनाथ मुंडे, सुप्रिया पवार - शरद पवार इ. सर्वसाधारण कुटुंबातील महिलांचे राजकारणातील स्वतःचे ओळख बनवण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. राजकारणातील महिलांच्या सहभागाविषयीच्या जागतिक सूचीत भारत १०५ व्या नंबरवर आहे. पाकिस्तान,बांग्लादेश, नेपाळ सारखे शेजारी देश याबाबत भारताच्या पुढे आहेत. जगातील मागसलेल्या व गरीब देशाच्या संसदेत महिलांच्या प्रतिनिधीत्वाचे प्रमाण २०-५०% पर्यंत आहे.उदा. नेपाळ - २२.५%, अफगाणीस्तान - २७.५%, पाकिस्तान - २२.५%, युरोप - ११%, अरब - ०.३%, अमेरिका - ३% इ. भारताच्या राज्यात ही महिला प्रतिनिधीत्वाबाबतची परिस्थिती वाईट आहे. यात सुधारणा करण्याचे प्रयत्न स्थानिक पातळीवरुन सुरु झाले. ज्यामुळे मध्यप्रदेश, हिमाचल प्रदेश, बिहार, उत्तराखंड, महाराष्ट्र या राज्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थात ५०% महिलांच्या सहभागाला मान्यता दिली. परंतु संसद आणि विधानसभेत महिलांच्या योग्य प्रतिनिधीत्वास संधी व मान्यता मिळत नाही.

अनेक प्रयत्न आणि जन जागृती करुनही कायदेमंडळात महिलांना ३३% आरक्षण देण्यास सर्वच राजकीय पक्ष तयार होत नाहीत. काही तर सरळ सरळ विरोध करतात. कांहीही कारणे सांगतात. अलीकडील काळात सेंटर फॉर स्टडीज ऑफ डेव्हलपिंग सोसाइटीज यांनी केलेल्या एका सर्वेनुसार ५०% पेक्षा अधिक मतदारांनी संसद आणि विधानसभेत महिलांच्या ३३% आरक्षणास मान्यता दिली. १४% लोकांनी विरोध केला तर ३६% लोक याबाबत आपले मत देत नाहीत. जात आणि धर्माची भाषा करणाऱ्या लोक प्रतिनिधीमूळे हे बील पास होत नाही . माकप नेता वृंदा करात यांच्या मते - संसदेत बसलेले कांही लोक, जे आपली सत्ता कोणत्याही स्थितीत गमावु इच्छित नाहीत. ते महिला आरक्षण विधेयकास विरोध करतात. तर अधिक प्रमाणात लोक त्याचे समर्थन करतात .जनता महिलांच्या बाजूने आहेत म्हणून त्याचे समर्थन करत नाहीत. तर हा विषय भारतीय लोकशाहीला सशक्त बनवण्याच्या प्रक्रियेतील महत्वाचा भाग आहे. शासनाने याकडे दुर्लक्ष करु नये. सुषमा स्वराजच्या मते - जेंव्हा एक महिलाच महिलाच्या अधिकाराविषयी गंभीर व जागरूक नाही. त्यास लटकवण्याचे काम करते. तर दुसऱ्याकडून काय अपेक्षा कराव्यात.

सारांशतः देशातील महिलांच्या राजकीय स्थितीत सुधारणा झाली आहे. पुढेही होत राहील. परंतू तिच्या कौटुंबिक, सामाजिक व पुरुषी मनोवृत्तीतील स्थानात आणखीन बऱ्याच सुधारणा होणे गरजेचे आहे. जोपर्यंत समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या व स्त्रीच्या मनातील स्त्री विषयीच्या चिंतनात मुलभुत बदल होणार नाही. सर्व पुर्वग्रह नष्ट होत नाहीत. त्यांच्या विषयीच्या वर्तनात बदल होत नाही. तोपर्यंत महिला सबलीकरणाच्या दिशेने शासनाने टाकलेले पाऊल यशस्वी होत नाही. २१ व्या शतकात स्त्री विषयीच्या पुरुषी मानसिकतेत बदल होत आहेत. परंतु त्याची गती अधिक हळुवार आहे. स्त्रीस माणुस म्हणून जोपर्यंत प्रत्येक क्षेत्रात समान दर्जा सन्मान, प्रतिष्ठा व अधिकार मिळत नाहीत. तिच्या भोवतीची सेकंड सेक्स, शोभेची वस्तु ही प्रतिमाने नष्ट होत नाहीत. तो पर्यंत महिला सबलीकरणाचा लढा चालुच ठेवावा लागेल. तो कुठपर्यंत चालेल हे निश्चित सांगता येत नाही. कारण महिला सबलीकरण ही विकासवादी प्रक्रिया आहे. कोणत्याही विकासवादी प्रक्रियेला यशस्वी बनवण्यात सर्वांच्या सक्रिय सहभागाची आवश्यकता असते. तरच लोकशाही सशक्त बनते.

१) लोकशाहीचे बदलते स्वरुप आणि निवडणुकांचे राजकारण डॉ. अल्का देशमुख - साईनाथ प्रकाशन,
२) लोकसभा निवडणूक विशेषांक २०१४ विचारशलाका - ऑगस्ट - २०१४ ते जानेवारी - २०१५ संपादक - प्रा. डॉ. नागोराव कुंभार.

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY
DEGLOOR COLLEGE DEGLOOR
Dist.Nanded

INDIAN THINKER
Half yearly Research Journal
ISSN - 2319- 8648
Vol 1 Issue VIII, Aug. 2016 to Jan. 2017


३) क्रांतीकारी युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर डॉ.अशोक मेनकुदळे - महाराष्ट्र बसव परिषद भालकी.
४) महिला सबलीकरण : स्वरुप आणि विकास - संपादक - प्रा.मुटे पांडुरंग, अरुणा प्रकाशन, लातूर.
५) महिला सबलीकरण - संपादक - प्रा.डॉ.संभाजी देसाई - प्रशांत पब्लिकेशन्स, जवळगाव.
६) कौटुंबिक हिंसाचार आणि कायदा - ॲड असिम सरोदे - मनोविकास प्रकाशन, पुणे.
७) तांबडे सुजित २००९ - राजकारणातील रणरागिणी - दै. महाराष्ट्र टाईम्स १९ सप्टेंबर २००९
८) बडे विलास २०१० महिला राज दै.लोकसत्ता १९ मार्च २०१०.
९) देशपांडे नमिता २०१३ घुंगटा कडून राजसत्तेकडे चतुरंग (लोकसत्ता) २१ डिसेंबर २०१३.
१०) समाज आणि महिला डॉ.निलम गोऱ्हे - पदमगंधा प्रकाश पुणे.
११) डॉ.मोहिनी कडू - भारतीय राजकारणातील स्त्रीया - विजय प्रकाशन - नागपूर.
१२) डॉ.दिपक पवार - महिलांचे राजकीय सक्षमीकरण - श्री साईनाथ प्रकाशन - नागपूर.

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded